महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४२ वे | दिनांक : १७/०५/२०२६ | वार : रविवार

## झुरळ उपमेवरून देशभर संताप; सरन्यायाधीशांच्या विधानावर टीकेची झोड



**मुंबई :** सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका प्रकरणात सुनावणी करताना बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी केली. काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवरच हल्ले करतात, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानाचे राज्याच्या राजकीय वर्तुळासह विविध क्षेत्रांतील जाणकांनी संमिश्र व्यक्त केले आहे. भारतात आपले विचार प्रकट करणाऱ्यांची तुलना झुरळांशी करणे अजिबात स्वीकारार्ह नाही. अशा प्रकारची भाषा कमालीची असहिष्णुता दर्शवते, अशी एकंदरीत भावना या प्रकरणी व्यक्त केली जात आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या प्रकरणी आपला संताप व्यक्त केला आहे. तसेच आपण झुरळ असल्याचा आपल्याला अभिमान असल्याचाही दावा केला आहे. त्या म्हणाल्या, सरकारला प्रश्न विचारणे, पारदर्शकतेची मागणी करणे, हे जर चुकीचे असेल तर होय मी झुरळच आहे आणि झुरळच राहणार. मला त्याचा अभिमान आहे. हे कुठेतरी भलत्या दिशेने जाताना दिसत आहे. सरकारकडून आपण काहीच अपेक्षा करू शकत नाही. राजकारणी हवे तसे वागत आहेत. याला जर आपण प्रश्न विचारत असू आणि आपल्याला झुरळ म्हटले गेले तर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

माननीय सरन्यायाधीश साहेब, होय मी 'झुरळ' आहे! मी एक भ्रष्टाचारविरोधी कार्यकर्ती आहे आणि याचा मला अभिमान आहे. झुरळ कधीही मरत नाही, ते टिकून राहते, लढत राहते. पारदर्शकता आणि जबाबदारी मागणे हा 'हल्ला' नाही, तो आमचा संविधानिक अधिकार आहे. न्यायव्यवस्था जेव्हा नागरिकांना 'कीटक' म्हणते, तेव्हा प्रश्न विचारणे आणखी गरजेचे बनते", अशी टीका दमानिया यांनी एका पोस्टद्वारे केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणी आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणाले, आपल्या न्यायव्यवस्थेचा अत्यंत आदर आणि सन्मान राखून असं म्हणावसं वाटतं की, भारतातील युवक, आरटीआय कार्यकर्ते, माध्यम प्रतिनिधी आणि वेगवेगळी मतं व्यक्त करणाऱ्यांची तुलना परजीवी किंवा झुरळांशी करणं अजीबात स्वीकारार्ह नाही. कारण अशा प्रकारची भाषा ही टीका करणाऱ्यांबद्दल आणि प्रश्न विचारण्यांबद्दल कमालीची असहिष्णूता दर्शवते.

न्यायालयाने केलेली टिप्पणी बनावट पदवीधारकांविषयीच्या आणि वरिष्ठ वकील दर्जा देण्यासंबंधीच्या याचिकेच्या संदर्भात करण्यात आली असली तरी त्यात बेरोजगार युवक आणि आरटीआय कार्यकर्त्यांनाही त्याच तराजूत तोलणं योग्य वाटत नाही. भ्रष्टाचार उघड करणारा आरटीआय कार्यकर्ता, पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करणारा कायदेविषयक पत्रकार आणि सत्तेला सत्य सांगणारा विद्यार्थी हे परजीवी किंवा झुरळं नाहीत तर तेच लोकशाहीचे खरे आधारस्तंभ आहेत, हे आधी आपण सर्वांनीच लक्षात घेण्याची गरज आहे.

संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीकडून अशा प्रकारची टिप्पणी म्हणजे दिलेली आश्वासनं न पाळल्यामुळं, संधी न मिळाल्यामुळं आणि वाढत्या बेरोजगारीने त्रस्त झालेल्या एका संपूर्ण पिढीची खिल्ली उडवणारी वाटते, जी अत्यंत वेदनादायक आणि दुर्दैवी आहे. आज देशातला युवक स्वतःच्या इच्छेने बेरोजगार नाहीत, तर ते सत्तेचं आर्थिक अपयश आणि राजकीय अकार्यक्षमतेचे बळी आहेत. रोजगार आणि विकासाच्या मोठमोठ्या भाषणांनंतरही लाखो सुशिक्षित युवा आज सन्मान, रोजगार आणि जगण्यासाठी संघर्ष करत आहेत.

त्यांना उत्तरदायित्व हवं आहे आणि आपले मत मांडण्यासाठी व्यासपीठही हवं आहे. याच युवांचा आवाज आज विविध संस्थांना त्यांचं काम योग्य पद्धतीने करण्यासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळं न्यायासनाला आमची फक्त एवढीच विनम्रपणे विनंती आहे की, युवांविषयी बोलताना माननीय न्यायालयाने संवेदनशीलता, संयम आणि घटनात्मक शहाणपण जपलं तर ते अधिक योग्य ठरेल, अन्यथा झुरळाची उपमा देण्यासारख्या भाषेमुळं विरोधी मत व्यक्त करणाऱ्या आवाजांचे अवमूल्यन होईल, आणि लोकशाहीमध्ये ते अपेक्षित नाही. जर संस्थांना युवकांच्या प्रश्नांची भीतीच वाटत असेल, तर ही समस्या युवकांची नाही तर सिस्टिमची आहे, हे आधी समजून घेण्याची गरज आहे, असे रोहित पवार म्हणाले.

माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी सरन्यायाधीशांच्या विधानावर रोष व्यक्त केला आहे. प्रश्न विचारणाऱ्या तरुणांना, RTI कार्यकर्त्यांना आणि स्वतंत्र माध्यमांना 'झुरळं' किंवा 'परजीवी' म्हणणं ही लोकशाहीची भाषा नाही — तो सत्तेच्या अहंकाराचा चेहरा आहे. भ्रष्टाचार उघड करणारे, जनतेचे प्रश्न मांडणारे आणि व्यवस्थेला जबाबदार धरणारे लोक त्रासदायक वाटत असतील, तर समस्या कार्यकर्त्यांमध्ये नाही... उत्तर द्यायला घाबरणाऱ्या व्यवस्थेमध्ये आहे, असे ते म्हणालेत.

अभिनेते अतुल कुलकर्णी यांनीही सरन्यायाधीशांच्या विधानावर आपले मत व्यक्त केले आहे. झुरळांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे हे खरं आहे? बऱ्याच वर्षांच्या राष्ट्रीय आणि पक्षीय धोरणांच्या अपयशामधे विनाकारण त्यांना खेचल्या बद्दल? असे ते प्रश्नार्थक सूर आळवत म्हणालेत.वकील असीम सरोदे यांनीही सरन्यायाधीशांच्या विधानावर उपरोधिक प्रतिक्रिया दिली आहे. 'कॉकरोच' आणि 'परजीवी' असे शब्द वापरून न्यायालयाने स्वतःची वैचारिक अवस्था दयनीय झाल्याचेच जाहीर करून टाकले. नवीन पिढीची अक्कल काढून बेरोजगार तरुणांचा अपमान केलाच आणि पत्रकार, आरटीआय कार्यकर्ते यांची तुलना झुरळांशी केल्याने झुरळांना नक्कीच आनंद झाला असेल.

शेवटी एका वाक्यातील विचार मायलॉर्ड ने सिद्ध केला की, "सर्वोच्च न्यायालय आणि सर्वोच्च शहाणपण या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत." सरन्यायाधीशांनी देशाची मोठ्या मनाने माफी मागावी. लोक माफ करतील. 'क्षमा बलस्य शक्तानाम, शाक्तानाम भुषणंम् क्षमा', असे ते म्हणालेत.

तत्पूर्वी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनीही सरन्यायाधीशांच्या विधानावरून तरुणांना खडेबोल सुनावले होते. ते शेलक्या शब्दांत म्हणाले होते, आयला! खरोखरच हे मंद निघाले! आज सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी भारतीय युवकांची तुलना झुरळाशी केली कॉक्रोच! न्यायधीश साहेबांनी ऑर्डर ऑर्डर करत महाराष्ट्रातील मंद सेनेच्या डोक्यात हातोडा मारला!

## देवेंद्र फडणवीस ब्राह्मण आहेत म्हणून त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न - गणेश नाईक



**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापू लागले आहे. मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट निशाणा साधला असतानाच, दुसरीकडे महायुतीचे नेते आणि मंत्री गणेश नाईक यांनी फडणवीसांची जोरदार पाठराखण केली आहे. देवेंद्र फडणवीस हे सर्वसमावेशक भूमिकेचे असतानाही केवळ ते 'ब्राह्मण' असल्यामुळेच त्यांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप गणेश नाईक यांनी केला आहे.

मंत्री गणेश नाईक यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना देवेंद्र फडणवीस यांची बाजू घेतली. देवेंद्र फडणवीस हे समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय मिळावा याच भूमिकेचे आहेत. मात्र, ते ब्राह्मण आहेत म्हणून त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला गेला, ज्याला राजकारण समजते त्याला हा सर्व प्रकार सहज लक्षात येईल, अशा शब्दांत नाईकांनी विरोधकांना सुनावले आहे. याचवेळी आजच्या बदलत्या राजकारणावर बोलताना त्यांनी, सध्याच्या राजकारणात अर्थकारणाशिवाय काही चालत नाही. तुम्ही केवळ स्वच्छ विचारसरणीचे आहात म्हणून लोक तुम्हाला निवडून देतील, याची आज शाश्वती राहिलेली नाही, अशी खंतही व्यक्त केली.

दुसरीकडे, मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली आहे. आम्ही जेव्हा जेव्हा मुंबईला गेलो, तेव्हा हैदराबादचा जीआर काढून त्याची अंमलबजावणी केली गेली, त्यावेळी आम्ही सरकारचे कौतुकही केले. काही प्रमाणपत्रे वाटली, पण त्यानंतर पुढे काय? असा सवाल जरांगे यांनी केला. सातारा संस्थानचा जीआर एका महिन्यात काढू म्हणे आठ महिने उलटून गेले, तरीही तो निघालेला नाही. राज्यातील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन अद्याप हवेतच आहे, ज्यांचे कुणबी रेकॉर्ड सापडले त्यांना व्हॅलिडीटी दिली जात नाही आणि शिंदे समिती आता रेकॉर्ड शोधत नाही, असा पाढाच त्यांनी वाचला.

मनोज जरांगे पुढे म्हणाले की, माझे फडणवीसांसंबद्दल वैयक्तिक वाईट मत नाही. पण माझ्या समाजाचे वाटोळे होणार असेल तर मी तुमच्यापैकी कोणालाच मोजणार नाही. मला मित्र नकोत की मंत्र्यांशी संबंध नकोत, मला फक्त माझ्या समाजाची लेकरं मोठी करायची आहेत. फडणवीस म्हणतात की मंत्र्यांना किंमत नसते, मुख्यमंत्रीच सर्वकाही असतो; मग आमची प्रमाणपत्रे अचानक देणे का बंद झाले? हे सर्व नेमके काय चालले आहे? मराठ्यांनीच तुम्हाला मुख्यमंत्री केले होते हे लक्षात ठेवा. देवेंद्र फडणवीस यांना वाटत असेल की तेच हुशार आहेत, तर शेतकरी आणि मराठा समाजही तितकाच हुशार आहे. फडणवीस तुम्ही काय, तुमच्या ५० पिढ्या जरी आल्या तरी मी मराठ्यांना धक्का लागू देणार नाही, असा इशारा देत जरांगे पाटील यांनी आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट केली. सरकारने येत्या ३० मे पूर्वी सर्वांना कुणबी प्रमाणपत्रे द्यावीत, अन्यथा ३० मे पासून आपण पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ मे २०२६

# ग्राहक पंचायत तालुकाध्यक्षपदी रुपेश भारुका, शहराध्यक्ष स्वप्नील उपासनी



**कन्नड (अरुण थोरात) :** अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या तालुका अध्यक्ष पदी रूपेश भारुका तर शहर अध्यक्ष पदी स्वप्निल उपासनी ची निवड करण्यात आली आहे.अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने दि. ११ मे रोजी ऑनलाइन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत संघटनेच्या आगामी तीन वर्षांच्या कार्यकाळासाठी कन्नड तालुका व कन्नड शहर कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. बैठकीत संघटनेच्या माध्यमातून ग्राहक जनजागृती, ग्राहक हक्क संरक्षण तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाध्यक्ष धनकुमार मंडलेवा यांनी नव्या कार्यकारिणीची घोषणा केली.कन्नड तालुका कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:- अध्यक्ष- रुपेशजी भारुका, उपाध्यक्ष- दिलीप पवार, उपाध्यक्ष- सागर पाटील, सचिव- सुनील जैन, सह सचिव- रामचंद्र लालवानी, संघटक- रोहित परिथानी, सदस्य- विलास चिकटे, सदस्य- प्रशांत जैस्वाल, प्रतीक भडाईत, जगदीश देसले, महिला प्रमुख- वर्षा लहाने, कन्नड शहर कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:- अध्यक्ष- स्वप्नील उपासणी, उपाध्यक्ष- नंदकुमार भोजवळ, उपाध्यक्ष- सहयोग जव्हाळे, सचिव- केदार जवळकर, सह सचिव- राजेश कुलकर्णी, संघटक- विजय पडमे, महिला प्रमुख- वैशाली कान्होरे या बैठकीस प्रांत संघटक रामदासजी तोटे, उपाध्यक्ष धनंजय मुळे, जिल्हा सचिव नागेशजी गवते यांच्यासह संघटनेचे वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत असून, आगामी काळात ग्राहक हितासाठी प्रभावी कार्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# पोलिस भरतीची तयारी; युवकावर चाकूहल्ला



**करमाड :** पोलिस भरतीसाठी धावण्याचा सराव करणाऱ्या एका तरुणाला अडवून त्याच्यावर चाकूने हल्ला करून मोबाइल लुटल्याची घटना करमाड एमआयडीसी परिसरात गुरुवारी (14 मे) सायंकाळी पावणेआठ वाजता घडली. प्रमोद साहेबराव निकाळजे (19, रा. रेल्वे स्टेशन परिसर, करमाड) असे जखमी तरुणाचे नाव आहे.

प्रमोद हा पोलिस भरतीची तयारी करत असून, तो दररोज करमाड एमआयडीसी परिसरात धावण्याचा सराव करीत होता. गुरुवारी सायंकाळी साडेसात ते पावणेआठच्या सुमारास तो एमआयडीसीतील एका कंपनीमागील रस्त्यावर सराव करत असताना काळ्या रंगाच्या स्कुटीवरून तोंड बांधलेल्या दोन अज्ञातआरोपींनी त्याला अडविले. आरोपींनी त्याचा मोबाइल हिसकावण्याचा प्रयत्न केला. यावेळी प्रमोदने पळण्याचा प्रयत्न केला; मात्र समोरून आणखी दोन जण दुचाकीवर आल्याने तो त्यांच्या कचाट्यात सापडला. आरोपींनी प्रमोदच्या दंडावर व पाठीवर चाकूने वार केले. तसेच 49 हजार रुपये किमतीचा मोबाइल लुटून आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. जखमी अवस्थेत प्रमोद घरी पोहोचला. त्यानंतर त्याला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या पाठीवरील गंभीर जखमांवर 12 टाके घालण्यात आल्याची माहिती आहे. याप्रकरणी करमाड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**एमआयडीसी परिसरातील नागरिकांमध्ये भीती**

करमाड एमआयडीसी परिसरात पोलिस भरतीची तयारी करणारे युवक तसेच सकाळ-सायंकाळ फिरण्यासाठी अनेक नागरिक येत असतात. यापूर्वीही लुटमारीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्याची मागणी होत आहे.

# पत्नी, दोन मुलांना हार अर्पण करत आत्महत्या



**कोल्हापूर :** अडीच वर्षांपूर्वी झालेल्या एका अपघातात पत्नी व दोन मुलांना गमावलेल्या एका व्यक्तीने अपघातस्थळी आपल्या पत्नी व मुलांना हार अर्पण करत विष प्राशन करून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना कोल्हापुरात घडली आहे. या व्यक्तीचा मृतदेह काल सडलेल्या स्थितीत आढळला.

विराट विठ्ठललाल गौतम (५८) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते पुण्याच्या मांजरी बुद्रुक परिसरातील रहिवासी होते. त्यांची पत्नी नीलू (५०, मुलगी रिद्धीमा (१७) व मुलगा सार्थक (१३) यांचे २३ नोव्हेंबर २०२३ रोजी कोल्हापुरातील पुईखडी लगत खासगी बस उलटून झालेल्या अपघातात मृत्यू झाला होता. विराट स्वतःही या अपघातात जखमी झाले होते. पण ते बचावले. तेव्हापासून ते नैराश्यात गेले होते. ते नियमितपणे या अपघातस्थळी येऊन आपल्या कुटुंबीयांना पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहत असत. आपल्या भावना व्यक्त करत असत.

शुक्रवारी सकाळी काही वाहनधारकांना घाटात त्यांचा मृतदेह सडलेल्या स्थितीत आढळला. त्यांच्या खिशातील ओळखपत्रावरून त्यांची ओळख पटली. त्यांनी पत्नी व मुलांच्या विरहात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली.

विराट गौतम यांनी आत्महत्या करण्यापूर्वी सोशल मीडियावर एक पोस्ट केली. त्या पोस्टमध्ये ते म्हणतात, आज कोल्हापुरात देह त्याग केला आहे. कसं जगतोय माहिती नाही. जगामध्ये काही लोक अशी असतात, ज्यांच्याशिवाय जगणे कठीण असते. असे वाटते की, ती लोकं जगातून निघून गेल्यानंतर आम्ही कसे जगणार. माझे जगणे तेव्हाच संपले होते. गेल्या अडीच वर्षांपासून नीलू, रसिका व शर्विलशिवाय कसे जगलो हेच मला माहिती नाही. माझे जग त्याच क्षणी संपले होते.

दुसरीकडे, प्रेयसीला व्हिडिओ कॉल करून तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना नागपूरच्या लकडगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. आयुष अमर वामन असे मृताचे नाव आहे. आयुष हा नागपूर रेल्वे स्थानकावर हाऊस किपिंगचे काम करत होता. त्याचे एका तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. पण गत काही दिवसांपासून त्यांचे बिनसले होते. त्यामुळे आयुष तणावात होता. त्याने सोमवारी सकाळी आपल्या प्रेयसीला व्हिडिओ कॉल केला. तसेच तिच्यासमोरच स्कार्फपासून गळफास तयार करून आपण आत्महत्या करत असल्याचे सांगितले.

त्याच्या प्रेयसीने त्याला आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. पण अखेर त्याने स्कार्फ फॅनला अडवून गळफास घेतला. आत्महत्येपूर्वी त्याने आपल्या मोबाईलमधील चॅट्सही डिलिट केले. पोलिसांनी त्याचा फोन न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवत पुढील तपास सुरू केला आहे.






महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ मे २०२६

# ॥ झुरळ आख्यान ॥

पक्षी निरीक्षणातून माझे निसर्गाशी ऋणानुबंध जुळलेले आहेत. मात्र आज मी आकाशात उडणाऱ्या, झाडावर वस्ती करणाऱ्या पक्ष्यांबद्दल लिहीत नाहीये. आज मी बोलणार आहे आपल्या प्रत्येकाच्या घरातल्या अंधाऱ्या कोपऱ्यात दडलेल्या, पंख असूनही जमिनीवर तुरतुर पळणाऱ्या एका अत्यंत तिरस्कृत जीवाविषयी...म्हणजेच 'झुरळा' विषयी!'प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस' (PNAS) या जागतिक विज्ञान पत्रिकेत शास्त्रज्ञांनी झुरळांच्या वंशावळीचा एक रंजक इतिहास उजेडात आणला आहे. आपण ज्याला आजवर 'जर्मन झुरळ' (Blattella germanica) समजून युरोपीय पाहुणा मानत होतो, त्याचा खरा 'जन्मदाता' चक्क आपला भारत आणि म्यानमार आहे! जगातील 17 देशांमधून तब्बल 281 डीएनए (DNA) नमुने गोळा करून शास्त्रज्ञांनी हे गुपित उघड केले आहे.लॅटिन भाषेत या प्रजातीला 'Blatta' म्हणतात, याचा सोपा अर्थ आहे—'प्रकाशाचा वैरी' किंवा प्रकाशापासून दूर पळणारा. विज्ञान शोधानुसार सुमारे 2,100 वर्षांपूर्वी आशियाई झुरळाच्या मूळ प्रजातीपासून हे आजचे झुरळ उत्क्रांत झाले आणि हळूहळू मानवी वस्त्यांशी त्यांनी जुळवून घेतले.झुरळ नामक कीटकाने अंटार्क्टिकाचा बर्फाळ प्रदेश वगळता जगातील प्रत्येक खंडावर आपले पाय रोवले आहेत. शास्त्रज्ञांनी त्याच्या या जागतिक प्रवासाचे दोन मुख्य मार्ग शोधले असून, त्यानुसार पहिला मार्ग हा सुमारे 1,200 वर्षांपूर्वीचा आहे, जेव्हा भारताच्या भूमीवरून हा कीटक पूर्वेकडे चीनमध्ये आणि पश्चिमेकडे आशियातील विविध इस्लामिक राजवटींच्या काळात पसरला. तर दुसरा मार्ग म्हणजे सुमारे 390 वर्षांपूर्वी या झुरळाने ब्रिटिश आणि डच ईस्ट इंडिया कंपन्यांच्या जहाजांवर फुकट प्रवास करत युरोप गाठले आणि तिथून पुढे झुरळांनी संपूर्ण जग व्यापले. युरोपबाहेर 1842 मध्ये न्यूयॉर्कमध्ये पाण्याच्या कालव्याच्या बांधकामादरम्यान ही प्रजाती पहिल्यांदा आढळली, तेव्हा तिथल्या लोकांनी यांना हौसेने 'क्रोटन बग्स' असे नाव दिले होते.यांच्या नामकरणाचा इतिहासही मजेशीर आहे. 1767 मध्ये स्वीडनचे निसर्गशास्त्रज्ञ कार्ल लिनियस यांच्याकडे या झुरळाचे काही नमुने तपासायला आलेले होते, म्हणून त्यांनी याचे नाव चक्क 'जर्मन झुरळ' ठेवले. त्यापूर्वी, 1756 च्या 'सेव्हन इयर्स वॉर' दरम्यान रशियन सैन्याने याला 'प्रशियन झुरळ' म्हटले, तर प्रशियन सैनिकांनी याला 'रशियन झुरळ' म्हणून शत्रूचे नाव दिले होते. त्याही मागे गेल्यास, 1624 मध्ये कॅप्टन जॉन स्मिथ यांनी याला 'भारतीय कीटक' म्हणत 'कॅकारूटच' असा उल्लेख केला होता, जो पुढे 1859 मध्ये चार्ल्स डार्विन यांच्या 'ऑन द ओरिजिन ऑफ स्पीशीज' या ग्रंथात 'कॉकरोच' म्हणून कायमचा रूढ झाला.एक पक्षी आणि निसर्गमित्र म्हणून मला या जिवाच्या तीव्र जगण्याच्या ऊर्जेचे (Survival Instinct) मोठे कौतुक वाटते. या कीटकामध्ये कीटकनाशकांचा सामना करण्यासाठी स्वतःच्या जैविक रचनेत झपाट्याने बदल करण्याची अद्भूत क्षमता आहे. त्यामुळे अवघ्या काही पिढ्यांमध्येच ते कोणत्याही घातक रसायनाला पचवून शरीरात 'प्रतिकारशक्ती' तयार करतात. पण या कौतुकासोबतच एक आरोग्याचे मोठे संकटही जोडलेले आहे. चीनमधील एका ताज्या अभ्यासानुसार, ही झुरळे 'ई. कोलाय' आणि 'सॅपोव्हायरस' सारखे भयानक अन्नजन्य आजार पसरवतात.माणूस आज विज्ञानाच्या बळावर चंद्रावर वस्त्या करायच्या गप्पा मारत आहे; पण रात्री स्वयंपाकघराचा दिवा लागल्यावर समोर येणाऱ्या एका इवल्याशा झुरळाला पाहून आजही भल्याभल्यांची तंतरते, हीच वस्तुस्थिती आहे! हे झुरळ जिवंत राहण्यासाठी स्वतःमध्ये अशीच उत्क्रांती करत राहणार. त्यामुळे माणूस आणि झुरळ यांच्यातील हे 'अस्तित्वाचे महायुद्ध' आगामी अनेक वर्षे असेच अखंड सुरू राहील.


**पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ**

# करवंद महोत्सव आयोजनाची गरज - डॉ. शिवाजी हुसे



करवंद म्हणजे उन्हाळ्यात मिळणारा डोंगरचा रानमेवा. शहरात महागात विकला जातो, पण गावाकडच्या काटेरी झुडपांवर मुक्तपणे वाढतो.झाड कसं असतं:- नाव: करवंद, Carissa carandas- प्रकार: काटेरी झुडूप, २-४ मीटर उंच- पानं: छोटी, गर्द हिरवी, टोकदार- काटे: मजबूत, जोडीने येतात. म्हणूनच कुंपणाला लावतात- फुलं: पांढरी, सुवासिक, मार्च-एप्रिलमध्ये येतातफळाची वैशिष्ट्ये:१. रंग: कच्चे असताना हिरवे-पांढरे, पिकल्यावर गडद जांभळे किंवा काळपट२. चव: कच्चे खूप आंबट-तुरट, पिकल्यावर आंबट-गोड३. हंगाम: एप्रिल ते जून. पावसाळ्याच्या सुरुवातीला संपतो४. आकार: लहान बोराएवढे, गोल किंवा लंबगोलउपयोग:- खाण्यासाठी: पिकलेले करवंद तसेच खातात. मिठ लावून तर अजून भारी लागतात- लोणचं: कच्च्या करवंदाचं लोणचं प्रसिद्ध आहे. वर्षभर टिकतं- सरबत/जॅम: पिकलेल्या करवंदाचा रस, सरबत, जॅम बनवतात- औषधी: आयुर्वेदात यकृतासाठी, पचनासाठी, रक्त वाढवण्यासाठी वापर. लोह, क जीवनसत्त्व भरपूर- कुंपण: काटेरी असल्याने शेताच्या, घराच्या संरक्षणासाठी लावतातपोषणमूल्य: लोह, कॅल्शियम, फॉस्फरस, 'क' जीवनसत्त्व भरपूर. ॲनिमिया, स्कर्व्हीवर उपयोगी. अँटीऑक्सिडंट गुणधर्म आहेत.स्थानिक अर्थकारण आणि करवंदसुखना नदीच्या काठावर, चौका, सारोळा डोंगर परिसरात करवंदाची झुडपं मोठ्या प्रमाणात आढळतात. 'सुखना बचाओ' आंदोलनात जैवविविधता वाचवण्याच्या मुद्द्यात करवंदासारख्या स्थानिक वनस्पतींचं संरक्षण पण महत्त्वाचं आहे.चौका परिसरात शेतमजूर किंवा अल्पभूधारक शेतकरी उन्हाळ्यात जंगलात जाऊन करवंदं तोडून आणतात. दिवसभर उन्हातान्हात बसून ते विकतात. 40 ते 50 रुपये पावशेर असा भाव असतो. दिवसाला 400 ते 500 रुपये मिळत असल्याचे मजूर सांगतात.वर्तमान परिस्थितीत शेतमालाला योग्य भाव नाही. वाढते खर्च आणि बेभरवशाची शेती यामुळे ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न गंभीर झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यावर करवंदे विकण्याची वेळ आली आहे. शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांचे जीवन हे कायम प्रश्नात गुरफटलेले असते.करवंद महोत्सव : काळाची गरजगरज आहे प्रश्नांची उत्तरे शोधण्याची. याचे चांगले मार्केटिंग केले तर नक्कीच चांगला भाव मिळून रोजगारही मिळेल. काजवा महोत्सवाच्या धर्तीवर दरवर्षी या भागात करवंद महोत्सव घेतल्यास पर्यटकही येतील.या महोत्सवात करवंदाची विविध उत्पादने, लोणची, सरबत, जॅम यांचे स्टॉल लावता येतील. थेट ग्राहकांपर्यंत माल पोहोचेल. शेतकऱ्यांना दलालांशिवाय चांगला भाव मिळेल. पर्यटन वाढल्याने स्थानिकांना हॉटेल, वाहतूक यातून रोजगार मिळेल.सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती आणि त्रैमासिक तिफणच्या माध्यमातून शिवार संसदेत हा विषय मांडला जाणार आहे. नदी वाचवायची तर डोंगर वाचवावा लागेल. डोंगर वाचला तर करवंदासारखा रानमेवा टिकेल. आणि तो टिकला तर शेतकऱ्याच्या हाताला काम मिळेल. म्हणूनच करवंद महोत्सव ही केवळ संकल्पना नाही, तर ती ग्रामीण अर्थकारणाला उभारी देणारी चळवळ ठरू शकते. त्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ मे २०२६


## चिनी वस्तूंवर बहिष्कार शक्य आहे काय ?

**भा**रत आणि चीन यांच्यात सीमावाद, भू-राजकीय संघर्ष, डोकलाम, गलवान खोरे, हिंद महासागरातील वर्चस्वाची स्पर्धा अशा अनेक कारणांनी तणावपूर्ण संबंध आहेत. तरीही वास्तव असे आहे की, भारताची अर्थव्यवस्था आणि औद्योगिक क्षेत्र आज मोठ्या प्रमाणात चीनवर अवलंबून आहे. चिनी वस्तूंवर बहिष्कार टाका, स्वदेशीचा वापर करा अशा घोषणा राजकीय स्तरावर होत असल्या तरी प्रत्यक्ष व्यवहारात ते शक्य आहे काय ? या संदर्भात घेतलेला हा आढावा. चीनने गेल्या तीन दशकांत जगातील सर्वात मोठी उत्पादन साखळी निर्माण केली आहे. उद्योग, ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्मिती, पायाभूत सुविधा, दूरसंचार, सौरऊर्जा, वाहन उद्योग, मोबाईल उत्पादन या जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये चीनची प्रबळ पकड आहे. स्वस्त उत्पादन, मोठ्या प्रमाणावरील निर्मिती, वेगवान पुरवठा व्यवस्था आणि तांत्रिक क्षमता यामुळे चीन आज जगाचा कारखाना बनला आहे. सार्वजनिक व्यासपीठावर उभे राहून भारतीय राज्यकर्ते चीनविरोधी गरळ ओकतात मात्र त्याच व्यासपीठावरील LED स्क्रीन, ध्वनी यंत्रणा, कॅमेरे, ड्रोन आणि नेत्यांच्या हातातील मोबाईलदेखील बहुधा चिनीच असतात. हीच आजच्या भारतीय अर्थकारणातील सर्वात मोठी विडंबना आहे. राज्यकर्त्यांनी भावनिक घोषणांपेक्षा प्रामाणिकपणे वास्तव स्वीकारणे गरजेचे आहे. वर्तमानात सीमेवर चीनविरोधी घोषणा आणि बाजारात चिनी मालाची विक्रमी विक्री, हेच भारताचे दुहेरी वास्तव बनले आहे. आत्मनिर्भर भारतचे नारे दिले जातात, पण वस्तुस्थिती अशी आहे की, भारतीय अर्थव्यवस्थेतील अनेक महत्त्वाची चाके चीनच्या कारखान्यांमधून फिरतात. मोबाईलपासून औषधांपर्यंत, सौरऊर्जेपासून मेट्रोपर्यंत, खेळण्यांपासून दिवाळीच्या रोषणाईपर्यंत सर्वत्र चीनची उपस्थिती आहे. चिनी वस्तूंवर बहिष्कार टाका, हे म्हणणे सोपे आहे मात्र प्रश्न असा आहे की, नागरिकांनी नेमके कोणत्या वस्तूंवर बहिष्कार टाकायचा? मोबाईल, टीव्ही, सौर पॅनल, औषधांचा कच्चा माल, उद्योगातील मशीनरी, इंटरनेट नेटवर्कची उपकरणे, इलेक्ट्रॉनिक घटक? कारण भारतीय बाजारपेठेत आणि प्रत्येक भारतीय घरात “मेड इन चायना ” शांतपणे ठाण मांडून बसलेले आहे. गलवान संघर्षानंतर देशभरात चीनी बहिष्काराच्या मोहिमा सुरू झाल्या. काही संघटनांनी चिनी टीव्ही फोडले, खेळणी जाळली, ॲप्स हटवले. पण दुसऱ्याच दिवशी त्याच लोकांनी ऑनलाइन सवलतीत चिनी मोबाईल खरेदी केले. हा भारतीय मध्यमवर्गीय राष्ट्रवादाचा सर्वात मोठा विनोद ठरला. राजकीय भाषणांमध्ये चीन भारताचा शत्रू असतो पण अर्थव्यवस्थेमध्ये तो अनिवार्य भागीदार बनतो. हे वास्तव आहे. ही परिस्थिती इतकी विचित्र आहे की, सीमेवर भारतीय सैनिक चिनी सैन्याला रोखत असतात, आणि शहरांमध्ये ग्राहक चिनी मालासाठी ऑनलाइन सेलची वाट पाहत असतात. वर्तमानातील भारतीय उद्योगांची वास्तविकता बघायचे झाल्यास भारतीय उद्योगपती स्वदेशीचे समर्थन करतात पण उत्पादन खर्च कमी ठेवण्यासाठी त्यांनाही चीनची गरज भासते. कारण चीन स्वस्त उत्पादन देतो, जलद पुरवठा करतो, मोठ्या प्रमाणावर उत्पादन करू शकतो आणि ते तांत्रिकदृष्ट्या अधिक प्रगत सुध्दा आहे. भारतीय उद्योगाला जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर त्याला स्वस्त कच्चा माल आणि घटक लागतात. ते चीनमधूनच येतात. परिणामी चिनी वस्तूंवर बहिष्कार ही घोषणा भावनिकदृष्ट्या आकर्षक असली तरी आर्थिकदृष्ट्या अवघड ठरते. दरवर्षी दिवाळी आली की चिनी दिव्यांवर बहिष्कारचे आवाहन सुरू होते. पण बाजारात सर्वाधिक विक्री ही चिनी प्रकाश माळांचीच होते. कारण त्या स्वस्त असतात. ग्राहकाला राष्ट्रवादापेक्षा किंमत महत्त्वाची वाटते. व्यापाऱ्याला भावनेपेक्षा नफा महत्त्वाचा वाटतो आणि सरकारलाही घोषणांपेक्षा अर्थव्यवस्था महत्त्वाची वाटते. यामुळे बहिष्कार हा अधिकाधिक प्रतीकात्मक कार्यक्रम बनतो. भारत-चीन राजकीय संबंध तणावपूर्ण असले तरी दोन्ही देशांमधील व्यापार सातत्याने वाढत आहे. प्रत्येक वर्षी भारताचा व्यापार तुटवडा वाढतो आहे. यावरून स्पष्ट होते की, घोषणा जितक्या तीव्र, आयात तितकी विक्रमी. एकीकडे राजकीय भाषणांमध्ये चीनविरोधी ज्वाला धगधगत असते तर दुसरीकडे भारतीय बंदरांवर मात्र चिनी कंटेनर सतत उतरत असतात. भारताने गेल्या दोन दशकांत मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारल्या. यामध्ये अनेक ठिकाणी चिनी साहित्य, यंत्रे आणि तंत्रज्ञान वापरण्यात आले. भारताने अक्षय ऊर्जेला मोठे प्रोत्साहन दिले. परंतु सौरऊर्जा क्षेत्रात भारताची चीनवरील अवलंबित्व अत्यंत जास्त आहे. एका अहवालानुसार भारतातील सौर प्रकल्पांपैकी मोठ्या प्रमाणात सौर मॉड्यूल्स आणि सेल चीनमधून आयात केले जातात. काही वर्षांपूर्वी तर भारताच्या सौर बाजारपेठेतील जवळपास 78 टक्के उपकरणे चीनकडून येत होती. राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, तमिळनाडू, कर्नाटक येथील अनेक मोठ्या सौरऊर्जा प्रकल्पांमध्ये चिनी मॉड्यूल्स वापरण्यात आले आहे. भारत जगात औषधनिर्मितीमध्ये अग्रेसर असला तरीही भारतीय औषध उद्योगासाठी लागणारे अनेक मूलभूत घटक चीनमधून येतात. औषधी निर्मितीतील कच्च्या मालासाठी भारताचे चीनवरील अवलंबित्व 60 टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे विविध अहवाल सांगतात. भारताच्या अनेक खासगी औष्णिक ऊर्जा प्रकल्पांमध्ये चिनी यंत्रसामग्री वापरण्यात आली आहे. बॉयलर, टर्बाइन, जनरेटर, ट्रान्सफॉर्मर यांसारखी उपकरणे चीनमधून आणली गेली आहे. चिनी यंत्रे स्वस्त असल्यामुळे भारतीय कंपन्यांनी त्यांना प्राधान्य दिले. दिल्ली मेट्रो, मुंबई मेट्रो, नागपूर मेट्रो आणि इतर काही प्रकल्पांमध्ये चिनी कंपन्यांनी उपकरणे, सिग्नलिंग प्रणाली आणि रेल्वे यंत्रसामग्री पुरविली होती. अनेक पुल, औद्योगिक प्रकल्प आणि महामार्ग बांधकामातही चिनी यंत्रांचा वापर झाला आहे.आत्मनिर्भरतेचा खरा अर्थ काय?खरी आत्मनिर्भरता म्हणजे केवळ घोषणाबाजी नव्हे तर ती निर्माण होते संशोधनातून, तंत्रज्ञानातून, दर्जेदार उत्पादनातून, कौशल्य विकासातून आणि दीर्घकालीन औद्योगिक धोरणातून. भारत अजूनही इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, सौर तंत्रज्ञान, बॅटरी उत्पादन, औद्योगिक यंत्रसामग्री यामध्ये मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. हे वास्तव बदलल्याशिवाय बहिष्कार हे फक्त राजकीय घोषवाक्य राहील, यात तिळमात्र शंका नाही. भारताने चीनविरोधी घोषणांपेक्षा चीनसारखी उत्पादन क्षमता निर्माण करण्यावर भर दिला तरच खऱ्या अर्थाने आत्मनिर्भरतेचा मार्ग खुला होईल. अन्यथा बहिष्कार हा शब्द केवळ राजकीय टाळ्या मिळविण्यापुरताच मर्यादित राहील.



**डॉ. संतोष संभाजी डाखरे**
८२७५२९१५९६
(राज्यशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली)

## सारे गोंधळी

कुठे मिळतो?
गरिबा न्याय.
किती सोसतो,
सदा अन्याय. 1

न्याय देवता,
आहे आंधळी.
शिकून झाले,
सारे गोंधळी. 2

न्याय सर्वांना,
मिळत नाही.
गरीब सदा,
वाटच पाही. 3

न्याय निवाडा,
होणार कसे ?
सारे निघाले,
भित्रेच ससे. 4

खोटे बोलून,
आव आणतो.
तोच म्हणतो,
न्याय जाणतो. 5



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## कोल्हेदादा

कोल्हेदादा कोल्हेदादा
शिकारीची तुम्हा भारी हाव
लहान प्राणी घाबरतात
ऐकता तुमचे नाव

मारता तुम्ही थापा
बोलून गोड गोड
तावडीत सापडलेल्यांची
चांगलीच मोडता खोड

कोल्हेदादा तुमची
कधीच ना होते हार
सिंह,वाघ, हत्ती
यांनाही करता गार

धूर्तपणाची शिकवण
कुठं शिकलात राव
आम्हालाही सांगा ना
त्या शाळेचे नाव

युक्तीने सोडविता तुम्ही
भांडण लहान सान
म्हणून का हो चतुराईचा
मिळाला बहुमान!



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903